**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. राजाराम शंकरराव धारवट
जयंती सायझर्स, १८/२०८, इंडस्ट्रियल
इस्टेट एरिया, स्टेशन रोड, इचलकरंजी, कोल्हापूर
अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
कारागृह उपमहानिरीक्षक,
तुरुंग उद्योग, मध्यवर्ती इमारत,
पुणे ४११ ००१
उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
विधि अधिकारी, कारागृह महानिरीक्षणालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे
श्री. सतीश पाटील

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४/५/२००७ |
| १ | उपस्थित | **अपीलकर्ता**<br>श्री. राजाराम शंकरराव धारवट<br>जयंती सायझर्स, १८/२०८, इंडस्ट्रियल इस्टेट एरिया, स्टेशन रोड, इचलकरंजी, कोल्हापूर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा<br>विधि अधिकारी, कारागृह महानिरीक्षणालय, महाराष्ट्र राज्य, पुणे<br>यांचे तर्फे श्री. शरद ल.क्षीरसागर |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.३.२००६ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | यार्न टेंडर (शेडयुल टू टेंडर नं. टेक्स पी.सी.वाय/२००५.०६/ डी ०६ ) नोव्हेंबर २००५ ते १८ जानेवारी २००६ याबाबत आलेल्या सर्व निविदा, त्या सोबतचे कागदपत्र, कार्यालयीन तुलनात्मक तक्ते, अहवाल, निर्णय वगैरे या संबंधात जे असतील ते सर्व कागदपत्र |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. राजाराम शंकरराव धारवट, इचलकरंजी यांनी जन माहिती अधिकारी तथा विधि अधिकारी, कारागृह महानिरीक्षणालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांच्याकडे यार्न टेंडर (शेडयुल टू टेंडर नं. टेक्स पी.सी.वाय /२००५.०६/ डी ०६ ) या विषयाची माहिती मागितली होती. दि. १.११.२००५ ते दि. १८.१. २००६ या कालावधीतील या विषयाच्या संदर्भातील सर्व निविदा व अनुषंगिक कागदपत्रे त्यांनी मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा विधि अधिकारी, कारागृह महानिरीक्षणालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांनी दि. १६.२.२००६ रोजी ही माहिती त्यांना पाठविली. त्याविरुध्द त्यांनी दि. १.३.२००६ रोजी अपिलीय प्राधिकारी तथा कारागृह उपमहानिरीक्षक, तुरुंग उद्योग, मध्यवर्ती इमारत, पुणे यांच्याकडे अपील केले. परंतु 'अपिलाच्या कारणाबाबत व अपु-या वाटणा-या माहितीबाबत संदिग्धता असल्यामुळे पूर्वी पाठविलेल्या माहितीव्यतिरिक्त आणखी कोणती माहिती पाहिजे ते कळविल्यास त्यानुसार माहिती पाठविणे सोईचे होईल,' असे प्रभारी कारागृह उपमहानिरीक्षक (मुख्यालय), कारागृह महानिरीक्षणालय, महाराष्ट्र राज्य, पुणे श्रीमती स्वाती साठे यांनी दि. २३.३.२००६ च्या पत्रान्वये त्यांना कळविले. त्यांनी दि. २१.४.२००६ च्या पत्रान्वये केलेल्या स्पष्टीकरणानंतर त्यांना दि. ३०.४.२००६ रोजी माहिती देण्यात आली. श्री. धारवट हे स्वतः व्यावसायिक असून उपरोक्त

संदर्भातील त्यांची निविदा नामंजूर झाली होती, असे उत्तरवादीतर्फे आयोगापुढे नमूद करण्यात आले आहे. सर्व माहिती विहित मुदतीत दिलेली असतानाही व प्रथम अपिलावर कार्यवाही केलेली असतानाही श्री. धारवट यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. श्री. धारवट यांनी अशा प्रकारे द्वितीय अपील करणे व सुनावणीला समक्ष उपस्थित न राहणे अथवा कोणतेही निवेदन सादर न करणे हे उचित नाही. त्याबाबत आयोग तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

पुणे
दिनांक :- १२/७/२००७

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-१

श्री. श्याम आबा अहिवळे
११५ अ, मंगळवार पेठ, फलटण,
जिल्हा सातारा

अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,
फलटण, ता.फलटण, जि. सातारा
श्री. कैलास प्रभाकर जेबले

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
प्रभारी सचीव, कृषि उत्पन्न बाजार समिती,
फलटण, ता. फलटण, जिल्हा सातारा
श्री. गजानन दत्तात्रय देशमुख

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५.५.२००७ |

उपस्थित

**अपीलकर्ता**
श्री. श्याम आबा अहिवळे
११५ अ, मंगळवार पेठ, फलटण, जिल्हा सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, फलटण, ता.फलटण, जि. सातारा
श्री. कैलास प्रभाकर जेबले

**जन माहिती अधिकारी तथा**
प्रभारी सचीव, कृषि उत्पन्न बाजार समिती, फलटण, जिल्हा सातारा
श्री. गजानन दत्तात्रय देशमुख

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.३.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**

कृषि उत्पन्न बाजार समिती, फलटणचे संचालक श्री. दिलीप पवार यांनी सचीव जोतीराम ढेंबरे यांच्या विरोधात संबंधित खात्यांकडे केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने संचालक पणन विभाग, पुणे आणि उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा यांनी श्री. ढेंबरे यांच्या संदर्भात दिलेल्या कारवाईच्या आदेशाच्या छायांकित प्रती, कृषि उत्पन्न बाजार समिती फलटणच्या संचालक मंडळाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील, त्या संदर्भात कृषि उत्पन्न बाजार समितीने केलेल्या ठरावांच्या छायांकित प्रती

## विवेचन

कृषि उत्पन्न बाजार समिती, फलटण यांनी वृत्तपत्रांना दिलेल्या जाहिराती, देयके, संबंधित पत्रव्यवहार यांच्या प्रती व सचीव श्री. जोतीराम ढेंबरे यांच्याविरुध्द बाजार समिती संचालक श्री. दिलीप पवार यांनी केलेल्या तक्रारींबाबत संचालक, पणन विभाग, पुणे आणि उपनिबंधक सहकारी संस्था, सातारा यांनी दिलेल्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा तपशील, त्या संदर्भातील ठराव याची माहिती अपीलकर्ता श्री. श्याम आबा अहिवळे, फलटण यांनी मागितली होती. दि. २३.१२.२००३ व दि. ३०.१२:२००५ या दोन अर्जान्वये त्यांनी मागितलेल्या या माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा सचीव, कृषि उत्पन्न बाजार समिती, फलटण श्री. जोतीराम ढेंबरे यांनी कोणतीही माहिती दिली नाही, त्यामुळे श्री. अहिवळे यांनी केलेल्या अपिलाची सुनावणी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, फलटण यांनी घेतली व दि. ८.३.२००६ पर्यंत योग्य ते शुल्क घेऊन माहिती देण्याचा आदेश जन माहिती अधिका-यांना दिला. जन माहिती अधिकारी श्री. जोतीराम ढेंबरे यांनी माहिती देण्याचे कबूल केले, परंतु प्रत्यक्षात माहिती दिली नाही. त्यामुळे श्री. अहिवळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.५.२००६ रोजी अपील दाखल केले आहे.

श्री. ढेंबरे यांच्या विरुध्द असलेल्या तक्रारींचा विचार करुन त्यांना राजीनामा देण्यास सांगण्यात आले व ते दि. २५.६.२००६ रोजी सेवेतून मुक्त झाले, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, फलटण श्री. कैलास प्रभाकर जेबले यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. दरम्यान श्री. अहिवळे यांना अपेक्षित असलेली माहिती दि. २५.४.२००७ रोजी नि:शुल्क पुरविण्यात आली, असे फलटण कृषि उत्पन्न बाजार समितीचे प्रभारी सचीव श्री. गजानन दत्तात्रय देशमुख यांनी सांगितले. दोनही अर्जांमधील आपल्याला आवश्यक असलेली माहिती मिळाली असल्यामुळे आपली तक्रार राहिलेली नाही, असे श्री. अहिवळे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. माहिती नि:शुल्क दिली असली तरी ती देण्यास झालेला विलंब अक्षम्य असल्याचे

विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. ढेंबरे यांची कार्यपध्दती व त्यांच्या संदर्भातील तक्रारींबाबतची चौकशी या सर्व गुंतागुंतीमुळे विलंब लागल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हे स्पष्टीकरण स्वीकारण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दिनांक :- १७/७/२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे - १

श्री. अंगद केशवराव पांचाळ,
१६९, चित्रकुट बिल्डिंग, ज्ञानेश्वर नगर,
सी.टी.बस स्टॉप शेजारी, भोसल पिठाच्या
गिरणीपाठीमागे, जुळे सोलापूर, सोलापूर.

अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी, (गट अ),
जिल्हा परिषद, सोलापूर
श्री. म.न. कावळे

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,
राजीव गांधी मेमोरियल स्कूल फॉर ब्लाईंड,
विकासनगर, सोलापूर - ४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/५/२००७ |

| | | |
|---|---|---|
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा समाज कल्याण अधिकारी, (गट अ), जिल्हा परिषद, सोलापूर, श्री. म.न. कावळे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.६.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>दि. २९.४.२००२, दि. १०.६.२००२, दि. १७.७.२००२ रोजीच्या तडजोडीनुसार सेवा सलग करुन तसेच वेतनवाढीच्या फरकाची रक्कम खात्यावर जमा केल्याची माहिती द्यावी. अधीक्षक / अध्यक्ष यांच्यावर (आयोगाने) केलेल्या दंडात्मक व प्रशासकीय शिस्तभंगाच्या कार्यवाहीचा अहवाल | |

## विवेचन

श्री. अंगद केशवराव पांचाळ हे 'नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड'च्या 'राजीव गांधी मेमोरियल स्कूल फॉर द ब्लाईंड' या शाळेत संगीत शिक्षक आहेत. त्यांच्या सेवेतील खंडाच्या संदर्भात आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेला आदेश, तसेच अन्य प्रशासकीय व न्यायालयीन निर्णय या अनुषंगाने कारवाई करण्याबाबत श्री. पांचाळ संस्थेकडे व समाजकल्याण अधिकारी, ( गट-अ), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे विविध अर्ज करीत आहेत. सेवा सलग करणे, त्यानुसार वेतनवाढ देणे व सेवेत खंड दिलेल्या कालावधीचे वेतन मिळणे या संदर्भातील त्यांचे अर्ज आहेत. माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत त्यानी केलेला अर्ज याच स्वरुपाचा आहे. दि. २९.४.२००२, दि. १०.६.२००२ व दि. १७.७.२००२ रोजी समाजकल्याण अधिकारी, (गट-अ), जिल्हा परिषद, सोलापूर व सिव्हिल जज्ज, सिनिअर डिव्हिजन, सोलापूर यांच्यापुढे झालेल्या तडजोडीनुसार सेवा सलग करुन वेतनवाढीच्या फरकाची रक्कम आपल्या खात्यात जमा केल्याची माहिती मिळावी व ती माहिती विहित मुदतीत न दिल्याबद्दल संस्थेचे (जन माहिती अधिकारी ) अधीक्षक व अपिलीय प्राधिकारी (समाजकल्याण अधिकारी, गट अ, जिल्हा परिषद, सोलापूर ) यांच्यावर

दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी श्री. पांचाळ यांनी राज्य माहिती आयोगापुढील अपिलात केली आहे.

श्री. पांचाळ यांनी अर्ज व अपील कार्यालयाकडे केलेले नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, ( गट-अ), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. म.न. कावळे यांनी नमूद केले आहे. सेवा सलगता व वेतन देयक या अनुषंगाने संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना पदाधिका-यांनी पाठविलेली पत्रे व अन्य कागदपत्रे त्यांनी सादर केली आहेत, त्यावरुन संबंधित शाळेने जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, राजीव गांधी मेमोरिअल स्कूल श्री. सी.बी.गोंधळी तसेच अपिलीय प्राधिका-यांनी आवश्यक ती माहिती देण्याबाबत कसूर केलेली दिसत नाही. सेवाखंड दिलेल्या कालावधीचे वेतन संस्थेने अदा करावे, असा निर्णय आयुक्त, अपंगकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि. १५.९.२००३ रोजी दिला आहे. परंतु संस्थेने त्याविरुध्द मुंबई उच्च न्यायालयात दावा दाखल केला आहे, त्याचा निर्णय अद्याप व्हावयाचा आहे. दरम्यानच्या काळात याच विषयाच्या संदर्भात, 'सेवा सलग करुन वेतनवाढीची रक्कम जमा केल्याची माहिती त्वरित कळवावी,' अशा मागणीच्या अर्जावरचे श्री. पांचाळ यांनी केलेले अपील राज्य मुख्य माहिती आयुक्त डॉ. सुरेश वि. जोशी यांनी दि. २८.९.२००६ रोजी फेटाळले आहे. त्याच स्वरुपाचे हे अपील आहे. आपल्याला हव्या असलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करावी व तशी अंमलबजावणी केल्याची माहिती द्यावी, असे श्री. पांचाळ यांच्या मागणीचे स्वरुप आहे. माहितीच्या अधिकार अधिनियमाशी ते सुसंगत नाही. संबंधित विषयाच्या कार्यवाहीबाबतच्या सद्यःस्थितीची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी श्री. पांचाळ यांना उपलब्ध करुन दिली आहे. 'अध्यक्षांना संस्था चालविण्यास अकार्यक्षम ठरवून पदावरुन निलंबित करावे व त्या कार्यवाहीच्या अहवालाची प्रत आपल्याला द्यावी,' अशीही 'माहिती' श्री. पांचाळ यांनी आयोगापुढील अपिलात मागितली आहे. केवळ 'माहिती' असा शब्द वापरून कोणतीही मागणी करता येते, असा अपीलकर्त्याचा गैरसमज दिसतो.

संबंधित कागदपत्रे व निवेदने लक्षात घेता हे अपील माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कक्षेत बसणारे नाही. त्यामुळे आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक :- २४/७/२००७**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. सदाशिव दत्तात्रय निकम
१४, टेक्निकल हौसिंग सोसायटी,
ए वॉर्ड, वाशी रोड, कोल्हापूर — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी, — उत्तरवादी
जिल्हा परिषद, कोल्हापूर
श्री. विकास देशमुख

जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक ),
जिल्हा परिषद, कोल्हापूर
श्री. शरद गोसावी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४/५/२००७ |

| | | |
|---|---|---|
| ३ | उपस्थित | **अपीलकर्ता**<br>श्री. सदाशिव दत्तात्रय निकम<br>१४, टेक्निकल हौसिंग सोसायटी,<br>ए वॉर्ड, वाशी रोड, कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद, कोल्हापूर,<br>तर्फे प्रतिनिधी कक्ष अधिकारी<br>श्री. एम.जी. अडसुळे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक ),<br>जिल्हा परिषद, कोल्हापूर<br>श्री. शरद गोसावी |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.४.२००६ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | अनुदानीत माध्यमिक शाळांतील सन २००५.०६ मध्ये रिक्त होणा-या शिक्षक पदाची विषयवार आणि रोस्टरसह माहिती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सदाशिव दत्तात्रय निकम यांनी कोल्हापूर जिल्हा परिषद, माध्यमिक शिक्षण विभागाच्या कक्षेतील अनुदानीत माध्यमिक शाळांतील सन २००५ आणि २००६ मध्ये रिक्त होणा-या शिक्षक पदांची विषयवार आणि रोस्टरसह माहिती मागितली होती. परंतु 'शाळेचे मुख्याध्यापक हे माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केले असल्याने, माहिती संबंधित शाळेकडून घ्यावी,' असे जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर

यांनी कळविले. श्री. निकम यांनी त्याविरुध्द अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. या अपिलाची सुनावणी विहीत मुदतीत झालेली नाही. श्री. निकम यांनी दि. १४.२.२००६ रोजी अपील दाखल केले होते. त्याच्या सुनावणीची पहिली तारीख दि. २०.३.२००६ अशी देण्यात आली होती. त्या दिवशी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित नव्हते. नंतरची तारीख दि. २४.३.२००६ अशी निश्चित करण्यात आली, त्यावेळी अपीलकर्ता उपस्थित नव्हते. अखेर सुनावणी दि. ३.४.२००६ रोजी झाली. अपिलीय प्राधिका-यांनी श्री. निकम यांचे अपील फेटाळले, त्या विरुध्द त्यांनी दि. १०.५.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. जन माहिती अधिका-यांनी माहितीची मागणी करणारा अर्ज परत केला, हा माहिती पुरविण्यास दिलेला नकार आहे, तसेच अपिलीय प्राधिकारी यांनी वेळोवेळी सुनावणीच्या गैरसाईच्या तारखा ठरविल्या व ते स्वत: हजर राहिले नाहीत, असे श्री. निकम यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलात म्हटले आहे. अपिलीय प्राधिका-यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात वरील तारखांचा तपशील सादर करुन त्याचा इन्कार केला आहे. मात्र 'अर्जदाराने संबंधित माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी,' असे कळवून जन माहिती अधिका-यांनी त्यांचा अर्ज परत पाठविणे हे अपिलीय प्राधिका-यांनी ग्राह्य धरले आहे. ते चुकीचे आहे. संबंधित माहिती एकत्रित प्राप्त करुन देणे जिल्हा परिषद शिक्षण विभागाला शक्य आहे व प्रत्येक शाळेकडून स्वतंत्रपणे माहिती घेण्यास सांगण्याऐवजी तशी ती एकत्रित करुन देणे आवश्यक होते.

'अर्जदार यांनी मागितल्याप्रमाणे वर्गवारीनुसार माहिती ठेवण्यात येत नसली तरी सेवानिवृत्तीच्या संदर्भात शिक्षण संचालक आणि शासनास जी माहिती एकत्रित करुन सादर केली जाते त्याची प्रत अर्जदार यांना हा आदेश मिळाल्याच्या तारखेपासून ८ दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी,' असे स्पष्ट आदेश अपिलीय प्राधिका-यांनी दिले. परंतु असे असतानाही या मुदतीत माहिती दिली गेलेली नाही, असेही श्री. निकम यांनी आयोगापुढील अपिलात म्हटले आहे. मात्र, अपील आयोगापुढे सुनावणीला येईपर्यंतच्या दरम्यानच्या काळात आपल्याला अपेक्षित असलेली

माहिती मिळाली आहे, त्यामुळे आता आपली तक्रार राहिली नाही,' असे त्यानी स्पष्ट केले. परंतु 'प्रथम टाळाटाळ केली गेली आणि ब-याच प्रयासाने माहिती मिळाली असे घडू नये' असे आग्रही प्रतिपादन त्यांनी आयोगापुढे केले, ते रास्त आहे.

वरील बाबींचा विचार करता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील अमान्य.

२. प्रथम अपिलाची सुनावणी विहित मुदतीत केली गेली पाहिजे व दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली पाहिजे. याबाबत अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी दक्षता घ्यावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

( विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. १०.७.२००७.

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. अब्दुल अजिज छोटूभाई शेख
सि.स.नं.२, गोडोली, सातारा — अपीलकर्ता
ता. जि. सातारा

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
अधीक्षक, भूमि अभिलेख, सातारा
श्री. सुनिल पं. शिंदे — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी, सातारा
श्री. सोहन स. काळे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५/५/२००७ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. अब्दुल अजिज छोटूभाई शेख, सि.स.नं.२, गोडोली, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, सातारा श्री. सुनिल पं. शिंदे

जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, सातारा श्री. सोहन स. काळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.११.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.१२.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.१२.२००५ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७. २.२००६ |

**८. मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

१. श्री. शेख यांनी खरेदी केलेल्या जागेची असलेल्या नोंदी प्रमाणे दक्षिण उत्तर लांबी फुटामध्ये मिळावी.
२. श्रीमती लक्ष्मीबाई डांगरे यांच्या उर्वरीत जागेची लांबी दक्षिण - उत्तर फुटामध्ये मिळावी.
३. श्रीमती शांताबाई डांगरे यांच्या बक्षीस पत्रात दर्शविलेली दक्षिण - उत्तर लांबी श्री. शेख यांची मालकीची जागा वजा जाता बक्षीस पत्रात नमूद केलेल्या प्रमाणे बरोबर आहे काय.
४. बक्षीसपत्रात नमूद केल्याप्रमाणे चतु:सीमेत पश्चिम बाजूला श्री.लक्ष्मण जगताप यांच्या मालकीची जागा सिटी सर्व्हे नं.२ च्या पश्चिमेस होती काय.
५. शेख यांच्या मालकी हक्काची नोंद व बक्षीस पत्राप्रमाणे श्रीमती डांगरे यांच्या बक्षीस पत्राच्या नोंदीचा कालावधी
६. बक्षीसपत्र चुकीचे असल्याबाबत सदर जागेची मालकी हक्काची शहनिशा न करता नोंद न करण्याबाबत लेखी विनंती अर्ज आला होता काय.
७. दि. ११.४.९२ रोजी व दि. १.१०.९२ रोजी दिलेल्या नोंदी न करण्याबाबत दिलेल्या अर्जाची प्रत

## विवेचन

अपीलकर्ता श्री. अब्दुल अजिज छोटूभाई शेख यांनी साता-याच्या गोडोली सि.स.नं. २ या जागेच्या मालकी हक्काच्या नोंदीविषयी जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, सातारा यांच्याकडे माहिती मागितली होती. आपण खरेदी केलेल्या जागेचे दक्षिण - उत्तर मोजमाप, श्रीमती लक्ष्मीबाई डांगरे यांच्या जागेच्या बक्षीसपत्राप्रमाणे दक्षिणोत्तर लांबी व उर्वरित जागेचे मोजमाप, पश्चिमेला असलेल्या जागेचा तपशील, बक्षीसपत्राच्या अनुषंगाने जागेच्या मालकी हक्काबाबतचा आक्षेप घेणारा अर्ज व सन १९९६ चे संबंधित बक्षीसपत्र आदि तपशील श्री. शेख यांनी मागितला होता.

जन माहिती अधिका-यांनी त्यावर पुढील उत्तर दिले :

१. गोडोली सि.स.नं.२ या पूर्ण जागेची दक्षिण -उत्तर मापे टाकून नकाशाची मागणी कामी रितसर अर्ज करून नियमानुसार समक्ष फी भरणा करून ती प्राप्त करून घ्यावी.

२. अ.क्र. २ ते ८ मध्ये नमूद केलेल्या व्यवहार हे दुयम निबंधक यांचे नोंदणीकृत दस्ताने नोंदले असून त्यांचेकडे नोंद केलेल्या क्रमांकाचे दस्तऐवज प्राप्त करुन घेऊन त्यामध्ये सदर व्यवहाराचे वेळी दाखल केलेले स्केली नकाशे जोडले असलेस शिल्लक क्षेत्राचा तपशील देता येईल याची कृपया नोंद घ्यावी.

३. बक्षीसपत्राप्रमाणे नोंद न करणेबाबतचा दिलेला हरकत अर्ज सदर मिळकतीचे स्वयंसूची - धारिकेत आढळून येत नसलेने त्याबाबत खुलासा करता येत नाही.

त्याविरुध्द श्री. शेख यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, सातारा यांच्याकडे अपील केले. अधीक्षक, भूमि अभिलेख यांनी संबंधित कागदपत्र, बक्षीसपत्र व खरेदीपत्र यातील मोजमापाची माहिती श्री. शेख यांना देण्याचे आदेश जन माहिती अधिका-यांना दिले. त्यानंतरही योग्य माहिती मिळाली नाही, म्हणून श्री. शेख यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

साता-यातील गोडोली पेठेतील संबंधित २०६.५ चौ. मी. क्षेत्र श्रीमती लक्ष्मीबाई नारायण ऊर्फ बाबुराव डांगरे यांच्या हिश्श्याचे आहे. त्यातील १००/- चौ. मी. क्षेत्र त्यांनी दि. १४.१२.१९९० रोजी श्री. अब्दुल अजिज शेख यांना विकत दिले. २९.४ चौ. मी. क्षेत्र बक्षीसपत्रान्वये श्री. किशोर/दत्तात्रय प्रकाश डांगरे यांना दि. ३.३.१९९२ रोजी दिले. ७७.१ चौ.मी. क्षेत्र श्रीमती लक्ष्मीबाई डांगरे यांचे नावे शिल्लक राहिले आहे, असे मिळकत पत्रावरील नोंदीवरुन दिसते. त्यानुसार दिलेल्या मोजमापाना श्री. शेख यांचा आक्षेप आहे. तसेच पश्चिमेला श्री. लक्ष्मण जगताप यांच्या मालकीची जागा होती काय ? श्री. शेख यांच्या मालकीची जागा वजा जाता बक्षीसपत्रात नमूद केलेल्या जागेचे मोजमाप बरोबर आहे काय ? अशी काही माहिती दिली गेलेली नाही, असे श्री. शेख यांचे म्हणणे आहे. संबंधित बक्षीसपत्र चुकीचे असल्याचा निर्णय १९९२ साली झाला होता व तेच बक्षीसपत्र ग्राह्य मानून मालकी हक्काची नोंद झाली, ती कशी झ ाली याची माहिती आपल्याला कळावी अशी आपली मुख्य मागणी आहे, असे श्री. शेख यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. या नोंदीला त्यांचा आक्षेप असला तरी, 'महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये सक्षम प्राधिका-याकडे अर्ज दाखल करावा', असे आपण त्यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी सांगितल्याचे प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, सातारा यांनी नमूद केले. त्याप्रमाणे श्री. शेख यांनी अधीक्षक, भूमि अभिलेख, सातारा यांच्याकडे अपील दाखल केले असून त्याची सुनावणी सध्या सुरु आहे, असे त्यांनी नमूद केले. ही सुनावणी पूर्ण करुन दि. २५.५.२००७ पर्यंत प्रकरण निकाली काढण्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. बक्षीसपत्रानुसार केलेली नोंद व त्या बाबतचे सक्षम प्राधिका-यांकडील अपील हा स्वतंत्र विषय आहे. मात्र १९९६ साली या बक्षीसपत्रानुसार नोंद केली जाण्याची कारणे, मागणी केलेले मोजमाप व नोंदीला हरकत घेणा-या अर्जाची प्रत ही माहिती श्री. शेख यांना मिळणे आवश्यक आहे.

बक्षीसपत्राप्रमाणे नोंद न करण्याबाबतचा हरकतअर्ज उपलब्ध होत नाही, हे माहिती अधिका-यांनी नमूद केलेले कारण मान्य करता येणार नाही. विशिष्ट कालावधीनंतर काही कागदपत्रे (D papers ) नष्ट केली जातात, असे उपस्थित अधिका-यांनी या वेळी नमूद केले. परंतु त्याची नोंदणी, तसेच आवक - जावक नोंदपुस्तकातील उल्लेख नष्ट होण्याचे कारण नाही. वादग्रस्त विषयाबाबत तर कोणतीही कागदपत्रे नष्ट केली जाणे आक्षेपार्ह आणि म्हणून गुन्हा मानला पाहिजे. उपरोक्त जागेसंदर्भातील वाद सन

१९९२ पासून चालू असून संबंधित कागदपत्रे ताब्यात असणारे अधिकारी / कर्मचारी यांना कागदपत्रांच्या उपलब्धतेबाबत जबाबदार धरून कारवाई करावी लागेल. कारण या कागदपत्रांअभावी चुकीची, अपुरी व दिशाभूल करणारी माहिती दिली जात आहे, असा अपीलकर्त्याचा आक्षेप आहे, तो रास्त आहे.

उभय बाजूंची लेखी व तोंडी निवेदने आणि त्यांनी सादर केलेली कागदपत्रे लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील मान्य.

२. अपीलकर्त्याला द्यावयाची राहिलेली माहिती दि. १.८.२००७ पर्यंत निःशुल्क द्यावी.

३. अधीक्षक, भूमि अभिलेख, सातारा यांनी वरील कागदपत्रांबाबत संपूर्ण चौकशी करुन अपीलकर्त्याला योग्य माहिती न दिली जाण्यास जबाबदार असणा-या कर्मचा-यांची यादी त्यांच्य खुलाशासह व प्रास्तावित उपाययोजनेसह दि. ३०.७.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावी.

४. आवश्यक असलेली कागदपत्रे विशेषतः हरकतअर्ज न मिळाल्यास संबंधित कालावधीतील (१९९२ ते २००६) कागदपत्रांच्या जतनाची जबाबदारी असणा-या कर्मचा-यांविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदवावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. १८ .७.२००७

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. जगदीश आनंदराव वाडकर
रा. म्हाडा कॉलनी, क्षेत्र माहुली,
ता. जि. सातारा अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
विभागीय समाजकल्याण अधिकारी,
पुणे विभाग, पुणे उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,सातारा
श्री. दीपक वडकुते

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०/५/२००७ |
| ३ **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री. जगदीश आनंदराव वाडकर, रा. म्हाडा कॉलनी, क्षेत्र माहुली, ता. जि. सातारा<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सातारा श्री. दीपक वडकुते | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.२.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.३.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.४.२००६ |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

तत्कालीन विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्री. उमाकांत कांबळे हे सातारा येथे किती वर्षे कार्यरत होते व त्यांच्या कालखंडात वसतीगृहावर झालेल्या साहित्य व अन्नधान्य खरेदी खर्चाचा तपशील, व कार्यालय इमारत बांधकामाची खर्च, निविदा आदिंची माहिती

## विवेचन

विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्री. उमाकांत कांबळे हे सातारा जिल्ह्यात किती वर्षे सलग कार्यरत आहेत, त्यांच्या कारकिर्दीत त्यांच्या अधिकारात असलेल्या संपूर्ण वसतीगृहांतील साहित्य व अन्नधान्य खरेदीची सविस्तर माहिती, तसेच सदरबझार (सातारा) येथे बांधलेल्या इमारती व त्यावर केलेल्या खर्चाचा सविस्तर अहवाल, कार्यालय बांधकाम व इतर खर्च करताना कायदेशीर निविदा प्रसिध्द केल्या होत्या का, अशी माहिती अपीलकर्ता श्री. जगदीश आनंदराव वाडकर यांनी जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सातारा श्री. उमाकांत कांबळे यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित मुदतीत उत्तर पाठविले. परंतु आपल्याला अपेक्षित असलेली माहिती मिळाली नाही, असे नमूद करुन श्री. वाडकर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे अपील केले. संबंधित अधिकारी एकाच जागेवर इतक्या वर्षे का कार्यरत आहेत, त्यामुळे फलटण / क-हाड इत्यादी ठिकाणच्या वसतीगृहात घडलेले प्रकार योग्य आहेत का ? अशा स्वरुपाची मूळ अर्जात नसलेली माहिती प्रथम अपिलात विचारली आहे. अपिलाची सुनावणी न करता अपिलीय प्राधिका-यानी या संदर्भातील उत्तर श्री. वाडकर यांना पाठविले. परंतु 'मिळालेल्या माहितीत अनेक त्रुटी असून पूर्ण माहिती न मिळाल्यामुळे' श्री. वाडकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

या अपिलाची सुनावणी दि. १५.५.२००७ रोजी ठेवण्यात आली होती. संबंधितांना ही तारीख सोयीची नसल्याने सुनावणी दि. १६.५.२००७ रोजी ठेवण्यात आली. त्या दिवशीही श्री. उमाकांत कांबळे उपस्थित राहू शकले नव्हते त्यामुळे दि. ३०.५.२००७ रोजी उर्वरित सुनावणी करण्यात आली.

१. श्री. उमाकांत कांबळे हे सातारा जिल्ह्यात दि. २१.६.१९९९ पासून आजतागायत कार्यरत आहेत.

२. विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालयाकडून शासकीय वसतिगृहांसाठी लागणारे कोणतेही साहित्य, अन्नधान्य खरेदी करण्यात येत नाही.

३. सदरबझार, सातारा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह, सातारा व मुलींचे शासकीय वसतिगृह, सातारा ही दोन वसतिगृहे शासकीय इमारतीत असून इमारतींचे बांधकाम शासनाच्या धोरणानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येते. त्याची निविदासह सर्व प्रक्रिया त्या विभागाकडून करण्यात येत असल्याने निविदाबाबतची माहिती या कार्यालयाशी संबंधित नाही.

असे जन माहिती अधिका-यांच्या उत्तरात म्हटले आहे. मात्र श्री. वाडकर यांनी मूळ अर्जात मागितलेली मुद्दा क्र. ३ मधील (सदरबझार येथील कार्यालय इमारतीसाठी झालेला खर्च ) ही माहिती दिली नाही.

एक तर जन माहिती अधिका-यांच्या कार्यालयाकडे ही माहिती असणे व त्यांनी मिळवून देणे आवश्यक होते. तसेच ; नसल्यास संबंधित अर्ज त्या मुद्दयासाठी त्यांनी संबंधितांकडे पाठविणे आवश्यक होते.

अपिलीय प्राधिका-यांच्या उत्तरानुसार काही माहिती मिळाली. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहामधील १९९९ पर्यंतच्या खर्चाची माहिती दिली गेली नाही व 'ती प्राप्त होताच पाठविली जाईल ', असे कळविले. विहित मुदतीत माहिती देण्याचे बंधन त्यात लक्षात घेतलेले नाही, तसेच माहिती नेमकी केव्हापर्यंत दिली जाईल , हेही त्यात नमूद केलेले नाही. सदरबझार येथील कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम व त्यावरील खर्चाच्या संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर केलेल्या अहवालाची प्रत अपिलीय प्राधिका-यांनी पाठविली . परंतु त्याबरोबर ' इमारत बांधकामाचे शासकीय प्रणालीप्रमाणे निविदा प्रसिध्द केल्याचे दिसून येत नाही , असे कळविले. माहिती अधिका-यांनी 'निविदांचा तपशील या कार्यालयाशी संबंधित नाही ', असे कळविले होते , तर अपिलीय प्राधिका-यांनी

'निविदा प्रसिध्द केली नसल्याचे' नमूद केले आहे. श्री. वाडकर यांनी आपल्याला त्याबाबत श्री. कांबळे यांनी खोटी माहिती दिली असल्याचा आक्षेप घेतला आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सातारा श्री. दीपक वडकुते यांनी आयोगापुढे सादर केलेल्या निवेदनात मुद्दा क्र.३ बाबत अधिक स्पष्टीकरण केले आहे. 'सातारा जिल्ह्यातील आश्रमशाळांचे, अपंग शाळांचे संचालक, मुख्याध्यापक, अधिकारी, कर्मचारी यांच्या स्वेच्छा वर्गणीतून जिल्हा कार्यालयासाठी समाज कल्याण संकुल समितीने इमारत बांधून दिली असून तिचे रितसर हस्तांतरण विशेष समाज कल्याण अधिकारी, सातारा यांचेकडे दि. २९.८.२००३ रोजी समारंभपूर्वक करण्यात आले आहे. त्यामुळे त्यावर खर्च केलेल्या आकड्याचा आजपर्यंतचा सविस्तर अहवाल व सदरचे कार्यालय व इतर खर्च करताना कायदेशीर निविदा प्रसिध्द केल्या होत्या का, हा प्रश्न उद्‌भवत नाही. सदर इमारत शासनाच्या मालमत्ता नोंदवही (पीआरबी) घेण्यासाठी इकडून पत्र क्र. १०३९ दि. ३०.५.२००५ अन्वये प्रस्ताव शासनास सादर केला आहे,' असे त्यात म्हटले आहे.

'माहितीच्या अधिकारात श्री. उमाकांत कांबळे यांची चौकशी चालू असताना त्यांची पदोन्नती कोणत्या अधिकारात केली, तसेच श्री. कांबळे यांच्या इतरहीबाबतीत चौकशी सुरु असताना पदोन्नतीचा प्रस्ताव शासनास का सादर केला ? श्री. कांबळे यांनी राजकीय व आर्थिक पाठबळावरच प्रमोशन करुन घेतलेले आहे. इतर विभागांमध्ये अनेक अधिकारी स्वच्छ व निष्कलंक असताना इतरांच्या पदोन्नत्या डावलून श्री. कांबळे यांची अनेक ठिकाणी चौकशी सुरु असताना कोणत्या अधिकारात पदोन्नती करण्यात आली ? या सर्व बाबी संशयास्पद असून श्री. कांबळे यांची झालेली पदोन्नती चौकशी पूर्ण होईपर्यंत तात्काळ रद्द करण्यात यावी, ही विनंती ,' असे श्री. वाडकर यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

त्यांनी मागितलेल्या मूळ माहितीशी संबंधित नसलेले असे हे प्रश्न आहेत. मात्र मूळ विषयाबाबत दिलेली माहिती पहाता पारदर्शकता दिसत नाही.

श्री. वाडकर यांनी प्रथम व द्वितीय अपिलात प्रत्येक वेळी नव्या प्रश्नांची माहितीची भर घातली आहे. असे करता येणार नाही. त्यांच्या मूळ अर्जानुसार कार्यालयीन इमारतीवर झालेला खर्च व डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहातील १९९९ पासूनचा खर्च या बाबतची राहिलेली माहिती त्यांना देणे आवश्यक आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे लक्षात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहाचा सन १९९९ पासूनचा खर्च, सदरबझार येथील कार्यालयीन इमारतीच्या खर्चाबाबतचा तपशील अपीलकर्त्यास दि. ३०.७.२००७ पर्यंत द्यावा.

पुणे
दि. १९.७.२००७

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. प्रसाद गणपतराव धर्माधिकारी,
संस्थापक, छ. ताराराणी विकास आघाडी,
शिरोळ, जि. कोल्हापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
प्रभारी तहसीलदार, शिरोळ,
जिल्हा कोल्हापूर

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
निवासी नायब तहसीलदार, शिरोळ,
जिल्हा कोल्हापूर
श्री. प्रशांत ढगे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४/५/२००७ |
| ३ | संबंधित | **अपीलकर्ता**<br>श्री. प्रसाद गणपतराव धर्माधिकारी, संस्थापक, छ. ताराराणी विकास आघाडी, शिरोळ, जि. कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा<br>प्रभारी तहसीलदार, शिरोळ,<br>जिल्हा कोल्हापूर |

| | | |
|---|---|---|
| | | जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळ, जिल्हा कोल्हापूर, श्री. प्रशांत ढगे |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.१०.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.५.२००६ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | शिरोळ तालुक्यातील पूरग्रस्तांना मिळावयाच्या मदतीबाबतच्या अर्जांवरील कार्यवाही, तसेच पूरग्रस्त श्री. सुभाष मारुती चुडमुंगे, रा. मौजे आगर भाग शिरोळ, जि.कोल्हापूर यांनी प्रत्यक्ष तोंडी आणि लेखी जबाबानुसार माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार जालंदर कांबळे यांच्यावर दंडात्मक कारवाई झाली आहे किंवा कसे ? |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. प्रसाद गणपतराव धर्माधिकारी, शिरोळ, जि.कोल्हापूर यांनी शिरोळ तालुक्यातील पूरग्रस्तांना मिळणा-या शासकीय मदतीबाबत केलेल्या अर्जावरील कार्यवाही विषयीची माहिती दोन स्वतंत्र अर्जाद्वारे मागविली होती. परंतु ही माहिती वेळेत दिली गेली नाही तसेच अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरोळ यांनी कोणतीही कारणमीमांसा न देता त्यांचे अपील फेटाळले. त्याविरुध्द त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.५.२००६ रोजी अपील दाखल केले आहे.

शिरोळ तालुक्यात २६ जुलै ते १० ऑगस्ट २००५ या काळात कृष्णा, वारणा, पंचगंगा व दूधगंगा या नद्यांना महापूर आला होता. तालुक्यातील एकूण ५२ गावांपैकी ४२ गावे पूरग्रस्त झाली होती. त्यातील काही पूरग्रस्तांना मिळणा-या शासकीय मदतीबाबत श्री. धर्माधिकारी यांनी दि. २.१.२००६ व दि. १६.१.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार शिरोळ

यांच्याकडे दोन स्वतंत्र अर्ज सादर केले होते. त्याबाबत झालेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना ३० दिवसाच्या मुदतीत मिळाली नाही. श्री. जालंदर कांबळे हे तेव्हा निवासी नायब तहसीलदार व श्री. अशोक हेमाजी कांबळे हे तहसीलदार होते. पूरग्रस्तांना वेळेत व योग्य ती नुकसान भरपाई मिळाली नाही व या अधिकाऱ्यांनी गांभीर्याने आपली जबाबदारी पार पाडली नाही, असा श्री. धर्माधिकारी यांचा आरोप आहे. त्या संदर्भात विविध वृत्तपत्रांतून प्रसिध्द झालेल्या मजकुराची कात्रणे व अन्य कागदपत्रे त्यांनी सादर केली आहेत.

मौजे शिरोळ येथील पूरग्रस्त श्री सुभाष मारुती चुडमुंगे यांनी दि.१०.३.२००६ रोजी मदतीबाबतची माहिती मागितली, ती न मिळाल्याने दि. १७.४.२००६ रोजी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरोळ यांच्याकडे अपील केले, त्यानंतर दि. १७.४.२००६, दि. ४.५.२००६ रोजी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार यांना पूरक निवेदने दिली. त्या संदर्भात श्री. धर्माधिकारी यांनी माहिती मागितली होती. तसेच मौजे हसूर येथील पूरग्रस्त श्री. चन्नाप्पा दादू सुतार, मौजे शिरटी येथील श्रीमती. नंदा बाळासाहेब गंगधर, श्री. विलास भैरु भंडारे, श्री. जयराम बाबू भंडारे, श्री. विठ्ठल दादू भंडारे, श्री. आनंदा शिवप्पा भंडारे व श्री. मारुती विष्णू भंडारे यांच्या संदर्भातील आर्थिक मदत, त्यांनी दिलेल्या लेखी निवेदनांवरील कार्यवाही, मदत मिळण्याच्या विलंबाची कारणे, मंजूर मदत व प्रत्यक्ष दिलेली मदत यातील फरकाची कारणे आदि स्वरुपाची माहिती या अर्जांमध्ये मागितली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. जालंदर कांबळे यांनी 'माहिती तयार असून शुल्क भरण्याबाबतचे' पत्र त्यांना दि. २८.२.२००६ रोजी पाठविले. श्री. धर्माधिकारी यांनी दि. ३.३.२००६ रोजी शुल्क भरणा केल्यानंतर दि. १६.१.२००६ रोजीच्या अर्जाविषयीची माहिती त्यांना देण्यात आली. मूळ अर्जाला विहित मुदतीत उत्तर न मिळाल्याने श्री. धर्माधिकारी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरोळ यांच्याकडे केलेल्या अपिलावर त्यांनी दि. २.५.२००६ रोजी अपील फेटाळण्याचा एका ओळीचा निर्णय तहसीलदार श्री. अशोक कांबळे यांनी दिला. अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी घेतली नाही तसेच अपील फेटाळण्याचे कारण व पुढील अपील कोणाकडे करावयाचे याबाबतची माहिती दिली नाही.

याच अनुषंगाने ऑक्टोबर २००५ मध्ये वरील संबंधित व्यक्तींनी केलेले विविध अर्ज व वेगवेगळया अधिका-यांनी सादर केलेली निवेदने याचाही समावेश श्री.धर्माधिकारी यांनी आपल्या अर्जांमध्ये केला आहे. या सर्व अर्जांच्या संदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. जालंदर कांबळे व तत्कालीन तहसीलदार श्री. अशोक कांबळे यांनी दिलेली उत्तरे विहित मुदतीत नाहीत. पूरग्रस्तांच्या संदर्भातील विषय म्हणून ती संवेदनशीलतेने हाताळणे आवश्यक होते, परंतु तसे केले नाही, असे दिसते. मात्र अपुरा कर्मचारी वर्ग, पूरग्रस्त गावांची संख्या लक्षात घेता तातडीच्या कामाचा ताण, विविध स्वरुपाचे अतिरिक्त कार्यभार यामुळे व प्रत्यक्ष पुर्नवसनाच्या कार्यवाहीला प्रथम प्राधान्य दिल्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या निवेदनात म्हटले आहे. गैरप्रकार व अकार्यक्षमता दडविण्यासाठी या अधिका-यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली व विलंब लावला, असा आरोप श्री. धर्माधिकारी यांनी आयोगापुढील सुनावणीत केला. त्या स्वरुपाच्या वृत्तपत्रीय बातम्यांची कात्रणे त्यांनी पूरक कागदपत्रे म्हणून सादर केली. हा अलाहिदा विषय आहे. मुख्य मुद्दा माहिती मुदतीत व नेमकी

देण्याचा आहे. दरम्यानच्या काळात या दोनही अधिका-यांची अन्यत्र बदली झाली आहे. निवासी नायब तहसीलदार श्री. प्रशांत ढगे यांच्याकडेच प्रभारी तहसीलदार म्हणून कार्यभार आहे. उपरोक्त आरोपांचा इन्कार करतानाच त्यांनी उर्वरित माहिती आठ दिवसात देण्याचे मान्य केले.

वरील बाबी लक्षात घेता तत्कालीन निवासी नायब तहसीलदार व तहसीलदार यांनी माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत आवश्यक बाबींची पूर्तता केलेली नाही, असे दिसते. त्याबाबत त्यांनी दिलेले समर्थन पूर्णपणे मान्य करता येण्यासारखे नाही. या संदर्भात राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी जन माहिती अधिका-यांना यापूर्वीच सक्त ताकीद दिलेली आहे, त्याची जाणीव त्यांना, तसेच तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री. अशोक कांबळे यांना करुन देण्यात येत आहे. अपीलकर्त्याने माहिती मागताना नेमकेपणाने माहिती मागितली पाहिजे. अवास्तव भाष्य व अनेक विषयांचा व अर्जांचा एकत्रित समावेश यामुळे त्यांचे म्हणणे नेमकेपणाने स्पष्ट होत नाही याची दखल त्यांनी घ्यावी.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अमान्य.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार शिरोळ व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरोळ यांना माहितीच्या मागणीबाबत काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची समज देण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

( विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. १२.७.२००७.

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. शिवाजी जगन्नाथ वाडेकर
सरचिटणीस, महाराष्ट्र शासन दुग्धतंत्रज्ञ संघटना,
'ओंकार', ३१, अंजली कॉलनी, गेंडामाळ,
शाहूपुरी, सातारा
अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
उप सचीव, कृषि, पशुसंवर्धन,
दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग,
मंत्रालय, मुंबई.
श्री. स. या. ठाकरे
उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
अवर सचीव,
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय विस्तार
मुंबई-३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५/५/२००७ |

| | | |
|---|---|---|
| ३ | उपस्थित | **अपीलकर्ता**<br>श्री. शिवाजी जगन्नाथ वाडेकर<br>ओंकार, ३१, अंजली कॉलनी, गेंडामाळ, शाहूपुरी, सातारा<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा<br>उप सचीव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.<br>श्री. स. या. ठाकरे |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.६.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**

वित्तविभागाने शासन निर्णय क्रमांक वेपुर.१९९६ प्र.क्र.७/९६ सेवा-१० दि. ३१.१.१९९६ अन्वये इतर प्रशासकीय विभागांच्या अखत्यारीतील तत्सम पदांना कृषि व पदुम विभागाच्या ८ डिसेंबर १९९४ च्या शासन आदेशामधील तरतुदी लागू करण्यास मंजुरी दिली होती, तरीही दुग्धव्यवसाय विकास विभागातील पाळीव्यवस्थापक या पदास दि.१.१.१९८६ पासून २०००-३२०० ही सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याप्रकरणी, क्रमांक दुविआ/१०२००१/६९५८/प्र.क्र.३६/२००१/पदुम-७/सेवा-१ दि. ६.१२.२००१ दि. ४.९.२००२, दि. १४.१०.२००२ आणि दि. १६.११.२००२ अन्वये एकूण चार वेळा मा. प्रधान सचिव (पदुम) यांचेकडून वित्तविभागाकडे अनौपचारिक मान्यता व सहमतीसाठी प्रस्ताव पाठविला होता. परंतु वित्तविभागाकडून या प्रस्तावास मान्यता व सहमती का नाकारली आहे, याची माहिती

## विवेचन

दुग्ध व्यवसाय विकास विभागातील 'पाळी व्यवस्थापक' या पदाला दि. १.१.१९८६ पासून सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यास वित्त विभागाने मान्यता व सहमती का नाकारली याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. शिवाजी जगन्नाथ वाडेकर, सरचिटणीस, महाराष्ट्र शासन दुग्धतंत्रज्ञ संघटना यांनी जन माहिती अधिकारी तथा अवर सचीव, मुख्य सचीव कार्यालय, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,

मंत्रालय मुंबई यांच्याकडे मागितली होती. शासन निर्णय क्रमांक वेपुर.१९९६ प्र.क्र.७/९६ सेवा-१० दि. ३१.१.१९९६ अन्वये इतर प्रशासकीय विभागांच्या अखत्यारीतील तत्सम पदांना कृषि व पदुम विभागाच्या ८ डिसेंबर १९९४ च्या शासन आदेशामधील तरतुदी लागू करण्यास मंजुरी दिली होती, तरीही दुग्धव्यवसाय विकास विभागातील पाळीव्यवस्थापक या पदास दि.१.१.१९८६ पासून २०००-३२०० ही सुधारित वेतनश्रेणी लागू केली गेली नाही. याबाबत, चार वेळा प्रधान सचिव (पदुम) यांचेकडून वित्तविभागाकडे अनौपचारिक मान्यता व सहमतीसाठी प्रस्ताव पाठविला होता. परंतु वित्तविभागाकडून या प्रस्तावास मान्यता व सहमती का नाकारली आहे यांची माहिती श्री. वाडेकर यानी मगितली होती. त्याच बरोबर महाराष्ट्र शासनाच्या नियमावलीची प्रतही मागितली होती. ती त्यांना देण्यात आली. परंतु वित्त विभागाच्या निर्णयासंदर्भातील माहिती आपल्याला मिळालेली नाही म्हणून श्री. वाडेकर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उप सचीव, , कृ..., पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे अपील केले. अपिलाची सुनावणी करुन अपिलीय प्राधिका-यांनी 'माहिती दिलेली असल्याने' अपील निकाली काढले. त्याविरुद्ध श्री. वाडेकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. ७.७.२००६ रोजी अपील दाखल केले आहे.

मूळ विभागातील पदाला लागू केलेली वेतनश्रेणी इतर प्रशासकीय विभागातील तत्सम पदांना लागू करण्याचे शासनाचे धोरण ठरलेले आहे. असे असतानाही पाळीव्यवस्थापकांना कृषि अधिकारी (कनिष्ठ) ही मंजूर झालेली वेतनश्रेणी लागू केलेली नाही. गेल्या सुमारे १० वर्षांपासून हा विषय अपीलकर्त्याकडून विविध मार्गांनी मांडला जात आहे. पाळीव्यवस्थापकांना पाचव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याचा प्रस्ताव वित्त विभाग व शासनाच्या विचाराधीन आहे, असे आपल्याला दि. १४.१०.२००२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे ,असे श्री. वाडेकर यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले आहे. या विषयाच्या अनुषंगाने झालेला पत्रव्यवहार, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणापुढील दावा इ. संदर्भातील कागदपत्रे श्री. वाडेकर यांनी सादर केली .नियमावली मिळाली परंतु दिलेली अन्य माहिती आपण मागितलेल्या माहितीशी असंबध्द व हवी असलेली अशी नाही असे श्री. वाडेकर यांचे म्हणणे आहे. परंतु , कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाने या विषयासंदर्भात वित्त विभागाकडे सादर केलेले प्रस्ताव व त्यावरील वित्त विभागाच्या टिप्पण्या त्यांना देण्यात आल्या आहेत, त्यात अर्थ खात्याचा अभिप्राय स्पष्टपणे नमूद आहे. त्यामुळे माहिती दिली आहे ,असे अपिलीय प्राधिकारी तथा उप

सचीव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय , मुंबई श्री. स.या. ठाकरे यांनी स्पष्ट केले. ते रास्त आहे.

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांची पाळीव्यवस्थापकांना सुधारित वेतनश्रेणी देण्यास मान्यता आहे, तसे सरकारचे धोरणही ठरलेले आहे, त्याप्रमाणे अंमलबजावणी व्हावी हा अपीलकर्त्याचा मुख्य आग्रह आहे. अर्थ खात्याचा आक्षेप लक्षात घेता, या विषयाबाबत अर्थ खात्याशी संयुक्त चर्चा करावी लागेल, असे अपिलीय प्राधिकारी उप सचीव श्री. स.या. ठाकरे यांनी स्पष्ट केले. परंतु अशी बैठक आयोजित करणे व अंमलबजावणी करण्याबाबतची / न करण्याबाबतची कार्यवाही करणे हा विषय केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कक्षेतील नाही. आयोग या मागणीची नोंद घेत आहे व सचीव, , कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय वि[illegible]ग, मंत्रालय मुंबई व सचीव,वित्त विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचे या विषयाकडे लक्ष वेधत आहे.

आयोगाचा आदेश पुढील प्रमाणे:

**आदेश**

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. १७.७.२००७

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. चौडप्पा बसवणप्पा झुंजा,
रा. मैंदर्गी -४१३२१७, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर — उत्तरवादी
श्री. मधुकर आर्दड
तर्फे प्रतिनिधी
जिल्हा प्रकल्प अधिकारी,
नगरपालिका शाखा

जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगरपालिका शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
श्री. अे.एम. वायकोळे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/५/२००७ |

| | |
|---|---|
| ३ | उपस्थित<br><br>**अपीलकर्ता** श्री. चौडप्पा बसवणप्पा झुंजा, रा. मैंदगी-४१३२१७,<br>ता.अक्कलकोट, जि.सोलापूर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी,<br>नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर<br>श्री. अे.एम. वायकोळे |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.१२.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.१.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.२.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>उपदानाची रक्कम जमीन महसूलाप्रमाणे वसुल करुन अदा करणेबाबत नियंत्रण प्राधिकारी, उपदान प्रदान अधिनियम १९७२, सोलापूर यांनी प्रमाणित करुन दि. ३०.०५.२००५ रोजी आदेश केले आहेत. सहा महिन्यांचा कालावधी लोटूनही आजपावेतो कारवाई झालेली नाही. कारवाई करणेस कायद्यातील तरतुदीप्रमाणे अद्याप मुदत आहे का. अद्याप मुदत असल्यास किती दिवस आहे, मुदत नसल्यास कारवाई करुन रक्कम वसूल करुन अदा करण्यात आलेली नाही. याबाबत सविस्तर लेखी खुलासा |

## विवेचन

उपदान प्रदान अधिनियम १९७२ अन्वये उपदानाची रक्कम जमीन महसुलाप्रमाणे वसुल करुन अदा करण्याबाबत नियंत्रण प्राधिकारी तथा सहायक कामगार आयुक्त, सोलापूर यांनी आदेश दिल्याला सहा महिने उलटूनही कारवाई का झाली नाही व किती मुदतीत कारवाई अपेक्षित आहे,

याबाबतचा खुलासा अपीलकर्ता श्री. चोडप्पा बसवण्णप्पा झुंजा यांनी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्याकडे मागितला होता. परंतु जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने श्री. झुंजा यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकारी श्री. मधुकर आर्दड यांनी जन माहिती अधिका-यांचा निकाल ग्राह्य ठरवून श्री. झुंजा यांचे अपील निकाली काढले. त्याविरुध्द श्री. झुंजा यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

या विषयाची पार्श्वभूमी पुढीलप्रमाणे आहे :

श्री. झुंजा हे मैंदर्गी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील नगर परिषदेत जकात अधीक्षक म्हणून सेवेत होते. दि. ३१.१.२००३ रोजी ते सेवानिवृत्त झाले. त्यावेळी त्यांना उपदानाची रक्कम व इतर रक्कमा दिल्या गेल्या नाहीत. विविध पातळ्यांवर त्यासाठी ते प्रयत्न करीत आहेत. त्यांनी केलेल्या अर्जावर जिल्हाधिकारी, सोलापूर, कार्यालयातील नगरपालिका प्रशासन शाखेने उपदान रक्कम रुपये २,००,४९४.०० व त्यावरील देय व्याज अशी रक्कम श्री. झुंजा यांना त्वरित देण्याचे आदेश मैंदर्गी नगरपरिषदेच्या मुख्याधिका-यांना दिले होते. परंतु मैंदर्गी नगरपरिषदेची आर्थिक स्थिती बिकट असल्यामुळे १९८५ पासून निवृत्त झालेल्या कर्मचा-यांनाही उपदान, रजा रोखीकरण आदि रक्कम नगरपरिषदेने अदा केलेली नाही. १९८५ च्या अगोदरचे सात व नंतरच्या काळातील इ.स. २००५ पर्यंतचे एकवीस एवढे कर्मचारी सेवालाभांपासून वंचित राहिले आहेत. (आपण निवृत्ती वेतनावरच अवलंबून असल्यामुळे उपदानाची रक्कम न मिळाल्याने आपली अडचण होत आहे, असे नमूद करुन निवृत्त कर्मचा-यांनी उपदानाची रक्कम आपण बिनव्याजी घेण्यास तयार असल्याचे मैंदर्गी नगरपरिषद अध्यक्षांना व मुख्याधिका-यांना अर्जाद्वारे कळविले आहे.) त्यामुळे नगर परिषदेला जादा अनुदान मिळावे, असा प्रस्ताव आयुक्त तथा संचालक, नगरपालिका संचालनालय, मुंबई यांच्याकडे सादर केला आहे. ही सर्व माहिती श्री. झुंजा यांना जन माहिती अधिका-यांनी विहित मुदतीत कळविली आहे.

श्री. झुंजा यांनी सहाय्यक कामगार आयुक्त, कामगार न्यायालय, सोलापूर यांच्याकडे अ करुन वसुली दाखला दि. १०.१.२००६ रोजी प्राप्त करुन घेतला. त्यानुसार अंमलबजावणी का झाली नाही, हा श्री. झुंजा यांचा मुख्य प्रश्न आहे. उपदान वसुलीचा विषय श्री. झुंजा वेगवेगळ्या अर्जांच्या व निवेदनांच्या स्वरुपात सातत्याने मांडत असतात, असे कागदपत्रांवरुन दिसते. त्यांनी मूळ अर्जात मागितलेली माहिती दिली गेली आहे, त्यांचे देणे व त्या संदर्भात ते मांडत असलेल्या अडचणी याची आपल्याला कल्पना आहे. परंतु नगरपरिषदेकडे कर्मचा-यांचे वेतन अदा करण्यासाठीसुध्दा पैसे नाहीत. जादा अनुदान मिळविण्यासाठी प्रयत्न सुरु असले तरी ते अद्याप मिळालेले नाहीत. एकेकाळी अत्यंत गजबजलेली बाजारपेठ असलेले हे गाव होते. महाराष्ट्रातील अत्यंत जुन्या नगरपरिषदांपैकी ही एक. परंतु माग व्यवसाय बंद पडल्यामुळे, तसेच जकात बंद झाल्यामुळे नगरपरिषदेची आर्थिक स्थिती आज अत्यंत हलाखीची आहे. गावातील मर्यादित लोकसंख्या व मर्यादित उत्पन्न गटातील वस्ती यामुळे कर वसुली फार होत नाही. नियमित कारभार चालविणेही अवघड अशी परिस्थिती आहे. शासनाकडून मिळणा-या रकमेतून सर्व सेवानिवृत्तांना थोडी थोडी रक्कम यापूर्वी दिली गेली आहे व तसे देण्याचा प्रयत्न आहे, याची कल्पना श्री. झुंजा यांनाही आहे, असे जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. श्री. झुंजा यांनी त्याला दुजोरा दिला आहे. 'वसुलीची कारवाई न करता अयोग्य सबबी व कारणे पुढे करुन रक्कम वसुलीबाबत टाळाटाळ करण्यात येत आहे,' असा श्री. झुंजा यांचा आरो आहे. परंतु जन माहिती अधिका-यांनी तो अमान्य केला. रक्कम देण्याचे प्रयत्न असल्याचे त्या संदर्भातील पत्रव्यवहार व अन्य कागदपत्रे सादर करुन जन माहिती अधिका-यांनी स्पष्ट केले.

कर्मचा-यांना २० वर्षाहून अधिक काळ होऊन गेला तरी उपदानाची रक्कम मिळू नये हे अन्यायकारक व निवृत्तांना आर्थिक अडचणीत टाकणारे आहे ही वस्तुस्थिती आहे. मात्र हा विषय गुंतागुंतीचा व शासनाच्या अखत्यारीतील आहे. श्री. झुंजा यांनी विचारलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे. नगरपरिषदेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता कारवाईची निश्चित मुदत सांगणे शक्य

नाही, हे स्पष्ट आहे. वसुलीच्या आदेशाची अंमलबजावणी हा प्रशासकीय भाग आहे. माहितीच अधिकार कायद्याच्या कक्षेत तो येत नाही.

उभय बाजूंची निवेदने लक्षात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

आदेश

अपील फेटाळण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दिनांक :- २३/७/२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. युवराज श्रीरंग रसाळ
शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अपीलकर्ता
विद्यानगर, कराड, जि. सातारा

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
प्रभारी उपसंचालक, उत्तरवादी
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, पुणे- ५

जन माहिती अधिकारी तथा
प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था,
कराड, ता.कराड, जि. सातारा
श्री. सतीश जयंत कुलकर्णी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५/५/२००७ |

| | | |
|---|---|---|
| ३. **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. युवराज श्रीरंग रसाळ, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विद्यानगर, कराड, जि. सातारा<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा सहायक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे- ५ श्री. लक्ष्मण व्यंकटराव देशपांडे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कराड, ता.कराड, जि. सातारा श्री. सतीश जयंत कुलकर्णी | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.१०.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.११.२००५ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.४.२००६ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | अतिवृष्टीने नुकसान झालेल्या कर्मचा-यांना मिळणारे वेतन अग्रिम मिळाले नाही याबाबतचा खुलासा |

## विवेचन

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या कर्मचा-यांना मिळणा-या अग्रिम वेतनाची आपण केलेली मागणी नाकारण्याच्या कारणांची माहिती अपीलकर्ता श्री. युवराज श्रीरंग रसाळ यांनी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कराड, जि. सातारा यांच्याकडे मागितली होती. परंतु या अर्जावर जन माहिती अधिका-यांनी कोणतेही उत्तर दिले नाही . त्यामुळे श्री रसाळ यांनी अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे - ५ यांच्याकडे अपील केले. जन माहिती अधिका-यांनी विहित मुदतीत माहिती दिली असली तरी माहितीचा

अधिकार अधिनियमाखाली केलेल्या अर्जास उत्तर म्हणून ती दिली नाही, असा त्यांचा आक्षेप आहे. परंतु अशा उत्तराऐवजी अजाणतेपणे कार्यालयीन पत्राद्वारे ही माहिती दिली आहे, असे नमूद करुन अपिलीय प्राधिका-यांनी हे अपील फेटाळले. त्याविरुध्द श्री. रसाळ यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

अपिलीय प्राधिका-यांपुढील सुनावणीच्या वेळी श्री. रसाळ उपस्थित राहिले नव्हते व त्यांनी लेखी निवेदन सादर केले होते. आयोगापुढील सुनावणीतही आपण उपस्थित राहू शकत नसल्याचे कळवून श्री. रसाळ यांनी लेखी निवेदन पाठविले होते.

श्री. रसाळ हे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कराड या कार्यालयात वाहनचालक निदेशक असून त्यांनी केलेला अर्ज महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अन्वये केलेला आहे. हा कायदा आता निरस्त झाला असला तरी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खाली केलेला अर्ज समजून अपील सुनावणीसाठी दाखल करुन घेण्यात आले. अग्रिम न मिळण्याच्या कारणांची विचारणा दि. २९.१०.२००५ च्या अर्जान्वये त्यांनी केली असली तरी याच विषयाच्या अनुषंगाने संबंधित अधिका-यांकडे वेगवेगळे अर्ज त्यांनी केले आहेत. त्यांची उत्तरेही त्या त्या वेळी संबंधित अधिका-यांनी त्यांना दिली आहेत. 'सक्षम अधिका-यांचा दाखला व अनुदान प्राप्त झाल्याचा दाखला नाही,' असे एका पत्रान्वये त्यांना कळविण्यात आले होते. दरम्यानच्या काळात हे दाखले त्यांनी सादर केले.( सानुग्रह अनुदानाची कोणतीही नोंद / पुरावा नसताना ग्राह्य धरुन )दि. १७.१२.२००५ रोजी त्यांना तीन महिन्यांची अग्रिमाची रक्कम (रु.५४,०९०.०० ) रोखीने अदा करण्यात आली, असे प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कराड यांनी सविस्तर निवेदनाद्वारे स्पष्ट केले आहे.

आपल्याला माहितीच्या अधिकारात उत्तर मिळाले नाही, म्हणून माहिती अधिका-यांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी श्री. रसाळ यांच्या निवेदनातील मागणी आहे. परंतु या संदर्भातील पत्रव्यवहार बराच असल्यामुळे व विषय एकच असल्यामुळे आवश्यक माहिती कार्यालयीन पत्राद्वारे दिली. माहितीच्या अधिकारातील अर्जाचे म्हणून वेगळे उत्तर दिले नाही, असे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कराड यांनी केले व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे यांनी त्याला पुष्टी दिली. अपेक्षित

माहिती मिळणे हा मुख्य भाग पूर्ण झाला आहे ,(तसेच अग्रिम मिळण्याच्या श्री. रसाळ यांच्या मागणीचीही पूर्तता झाली आहे ), हे लक्षात घेऊन व संबंधित कागदपत्रांचा आणि निवेदनांचा विचार करुन अपील अमान्य करुन निकाली काढण्यात येत आहे.

आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

१. अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

पुणे
दि.१९ .७.२००७